## संशोधक विद्यार्थ्यांची महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ग्रंथालयास सदिच्छा भेट

शुक्रवार दि. 01 ऑगस्ट 2025 रोजी महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ग्रंथालयास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील हिंदी विभागाच्या सारथी, बार्टी व महाज्योतीच्या संशोधक विद्यार्थ्यांनी भेट दिली.

संशोधक विद्यार्थांचे स्वागत कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी.व्ही. गायकवाड, डॉ.संदीप पाटील व मा. अनिल पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाची पुस्तके भेट देऊन केले. प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी संशोधक विद्यार्थ्यांना संबोधित करताना मुली महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांची प्रेरणा घेऊन उच्च शिक्षण घेत, संशोधनाच्या क्षेत्रात आपला ठसा उमटवत असून त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहण्याचा प्रयत्न करीत असल्याबद्दल त्यांचे कौतुक ही केले.

कॉलेजचे ग्रंथपाल प्रा. अभयकुमार पाटील व सहायक ग्रंथपाल सागर रणदिवे यांच्या कडून संशोधक विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील दुर्मिळ ग्रंथ, विविध कोश, आधार ग्रंथ, संदर्भ ग्रंथाबरोबरच विविध पत्रिकांच्यासह ऑनलाईन उपलब्ध पुस्तकांची माहिती घेतली. त्यांनी ग्रंथालयात एकूण 83 हजार पुस्तके, 64 नियतकालिके, 10 विविध भाषेतील वृत्तपत्रे असून सदरचे ग्रंथालय संगणकीयकृत असून येथे मोठ्या प्रमाणात ई-स्त्रोत उपलब्ध असून परिसरात हे ग्रंथालय डिजिटल ग्रंथालय म्हणून ओळखले जात असल्याचे सांगितले.

हिंदी विभाग प्रमुख डॉ. प्रकाश आठवले यांनी ग्रंथालयाविषयी माहिती देताना हे ग्रंथालय सन1961 साली स्थापन झालेले असून शिवाजी विद्यापीठाअंतर्गत महाविद्यालयांमधील एक समृद्ध ग्रंथालय आहे. या ग्रंथालयात अत्यंत प्राचीन व दुर्मिळ ग्रंथ उपलब्ध आहेत. हे ग्रंथालय संशोधक विद्यार्थ्यांना सतत नवनवीन ग्रंथ व पत्रिका उपलब्ध करून संशोधक विद्यार्थ्यांची ज्ञानाची तहान /भूख भागवण्याचा प्रयत्न करीत असल्याचे प्रतिपादन केले.

यावेळी सुनिता आडसूळ, अश्विनी सोमदे, मलिका पकाली, गंगा येरुळकर, गीता पाटील, वैष्णवी शिंदे, शैलजा डुबल, प्रियांका वरनारायण, सुनिता कांबळे, अश्विनी थोरात, शितल चौगुले, जानकी देसाई या संशोधक विद्यार्थ्यांनी ग्रंथालयास सदिच्छाभेट दिली.

**कॉलेजचे प्राचार्य, उप - प्राचार्य, संस्था पदाधिकारी यांचे समवेत संशोधक विद्यार्थी**





ग्रंथाल्यातील पुस्तकांची पाहणी करताना संशोधक विद्यार्थी





## ग्रंथाल्यातील पुस्तकांची पाहणी करताना संशोधक विद्यार्थी



